REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित जमातीमधील साक्षरतेचे तुलनात्मक अध्ययन

प्रवीण परसराम बोरकर[1] , डॉ. नंदाजी राघोबाजी सातपुते[2]
[1] संशोधक
2 मार्गदर्शक , महिला महाविद्यालय, गडचिरोली.

## प्रस्तावना :–



गडचिरोली हा जिल्हा १९° ते २१° उत्तर अक्षांश आणि ८०° ते ८१° पूर्व रेखांशाच्या मध्यभागी आहे. मूळच्या चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन करून दिनांक २६/०८/१९८२ रोजी गडचिरोली या जिल्हयाची निर्मिती करण्यात आली. गडचिरोली जिल्हयाचे क्षेत्रफळ १४४१२.०० चौ. कि. मी. असून, त्यात ग्रामीण क्षेत्रफळ १४३३६.७६ तर शहरी क्षेत्रफळ ७५.२४ चौ. कि. मी. इतके आहे. जिल्हयाची उत्तर – दक्षिण लांबी ३५५ कि. मी. इतकी आहे. गडचिरोली हा जिल्हा महाराष्ट्रात विस्ताराने अहमदनगर, पुणे, नाशिक, सोलापूर यानंतर पाचव्या क्रमांकावर येतो. हया जिल्हयातील ११५६९ कि. मी. म्हणजे जवळपास ७५% भूभाग जंगलाच्छादित आहे. गडचिरोली हा जिल्हा "आदिवासी जिल्हा" म्हणून ओळखला जातो.

आदिवासी ही एक जात नसून जमात आहे. ती प्रामुख्याने अरण्यात किंवा डोंगर कपारीत वास्तव्य करते. **त्रिलिनच्या** मते "एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणा–या, समान बोलीभाषा बोलणा–या व समान सांस्कृतिक जीवन जगणा–या स्थानिक गटाच्या समूहाला आदिवासी म्हणतात."

आदिवासी समाज मागासलेला असून, त्याच्या न्याय्य हक्कांसाठी संपूर्ण जगात लढा सुरू आहे. त्यांना आता वनवासी न म्हणता "अनुसूचित जमाती" म्हटले जाऊ लागले आहे. जगात २७% इतकी आदिवासींची लोकसंख्या असून त्यापैकी ७% आदिवासींचे भारतामध्ये वास्तव्य आहे. एकटया महाराष्ट्रात २३ लक्ष आदिवासी आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील २३ लक्ष आदिवासींपैकी ४,१५,३०६ इतकी गडचिरोली जिल्हयातील आदिवासींची संख्या असून त्यांचे शेकडा प्रमाण १८.०५% इतके आहे. गडचिरोली जिल्हयाची एकूण लोकसंख्या १०,७२,९४२ इतकी असून एकूण लोकसंख्ये"ी आदिवासी लोकसंख्येचे असलेले प्रमाण ३८.७१% आहे. जिल्हयातील ४,१५,३०६ या एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी २,०७,३७७ पुरूष तर २,०७,९२९ स्त्रिया आहेत. ग्रामीण क्षेत्रातील आदिवासी जमातींची एकूण लोकसंख्या ३,९८,२६६ इतकी असून त्यात १,९८,७५३ पुरूष तर १,९९,५१३ स्त्रिया आहेत. शहरी क्षेत्रात आदिवासी जमातींची एकूण लोकसंख्या ही १७,०४० इतकी असून त्यात ८,६२४ पुरूष तर ८,४१६ स्त्रिया आहेत.

आदिवासी जमातींपैकी प्रामुख्याने गोंड, राजगोंड, परधान, माना, हलबी, पारधी इत्यादी प्रमुख आदिवासी जमातींचे जिल्हयात बाहुल्य आहे. माना या जमातीस

२००३ साली पुन्हा अनुसूचित जमातीत समाविष्ट करण्यात आले. या सर्व जमातींची मूळ संस्कृती जवळ जवळ सारखीच आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार गडचिरोली जिल्हयातील स्त्रियांचे प्रमाण हे दर हजारी पुरूषांमागे ९८२ असल्याचे दिसून येते. सन २००१ च्या जनगणनेमध्ये स्त्रियांचे हेच प्रमाण दर हजारी पुरूषांमागे ९७६ स्त्रिया इतके होते. भारतामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४० इतके असून, त्यामानाने गडचिरोली जिल्हा हा स्त्रियांच्या टक्केवारीत आघाडीवर असल्याचे दिसून येते.

**साक्षरता :—**

साक्षरतेचा अर्थ आहे साक्षर होणे अर्थात लिहिता व वाचता येण्याच्या क्षमतेने संपन्न होणे. जगातील प्रत्येक देशात साक्षरतेची व्याख्या ही वेगवेगळी असल्याची दिसून येते. भारतात राष्ट्रीय साक्षरता मिशन नुसार समजा एखादी व्यक्ती आपला नाव लिहिण्याची आणि वाचण्याची योग्यता प्राप्त करत असेल, तर त्याला साक्षर समजले जाते.

**साक्षरतेची गरज :—**

"विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली, नितीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले,, इतके अनर्थ एका अविद्येने केले" हे महात्मा फुले यांचे वचन सा—यांनाच माहित आहे. यातून शिक्षणाचे महत्व नेमकेपणाने प्रतीत होते.

आजच्या काळात अशिक्षितपणा हा एक अभिशाप आहे. सुशिक्षित व्यक्तीच चागल्या व सुदृढ समाजाची निर्मिती करू शकतो. सुशिक्षित व्यक्तीच आपल्या मुलाबाळांचे भवितव्य चांगल्या त—हेने घडवू शकतो.

निरक्षरता ही काळोखासमान असून साक्षरता साक्षात प्रकाश आहे. चांगले जीवन जगण्यासाठी लोकांचे साक्षर असणे जरूरी आहे आणि चांगले जीवन आपण तोपर्यंत जगू शकत नाही, जोपर्यंत आपले चांगल्या समाजात वास्तव्य राहात नाही आणि चांगल्या समाजासाठी लोकांचे शिक्षित असणे जरूरीचे आहे.

देशातील गरिबीचे संपूर्ण नायनाट करण्यासाठी, बाल—मृत्यूचे प्रमाण झपाटयाने कमी करण्यासाठी आणि लोकसंख्यावाढीच्या भस्मासुराला नियंत्रित करण्यासाठी लोकांचे शिक्षित असणे अत्यावश्यक आहे. कारण साक्षर लोकचं देशाच्या प्रगतीला हातभार लावू शकतात. सर्व शासकिय योजना व सोई—सुविधांचा लाभ उचलू शकतात. याउलट निरक्षर समाज हा निद्रिस्त असतो, तो शासकिय योजनेकडे डोळेझाक करतो व आहे त्या परिस्थितीत जगत असतो. त्यामुळे शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

युनेस्कोने दि. १७ नोव्हेंबर १९६५ रोजी फ्रान्स देशातील पॅरिस या मुख्यालयी ८ सप्टेंबर हा जागतिक साक्षरता दिन म्हणून दरवर्षी साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर ८ सप्टेंबर १९६६ हा दिवस संपूर्ण जगभरात सर्वप्रथम जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा करण्यात आला.

संपूर्ण विश्वातील साक्षरतेचे प्रमाण हे ८४% असून, भारतातील साक्षरतेचे प्रमाण हे ७४.०४% आहे. सन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र होण्याच्या वेळी भारतातील साक्षरतेचे प्रमाण हे केवळ १८% होते. भारतात साक्षरतेच्या बाबतीत पुरूष व स्त्री यांच्यामध्ये खूप अंतर असून सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ८२.१४% पुरूष तर ६५.४६% स्त्रिया साक्षर आहेत.

भारतामध्ये अनुसूचित जमातीमधील साक्षरतेचे प्रमाण हे ५८.९६% असून, त्यात ६८.५३% पुरूष व ४९.३५% स्त्रिया साक्षर आहेत.

गडचिरोली लिल्हयातील साक्षरतेचा विचार करता साक्षरतेचे प्रमाण हे शहरी व ग्रामीण भागात स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये अधिक आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील साक्षरतचे प्रमाण हे ७४.३६% इतके आहे. जिल्हयातील एकूण साक्षर लोकसंख्या ही ७,०८,३६५ असून त्यात ३,९५,११० पुरूष तर ३,१३,२५५ स्त्रिया आहेत. ग्रामीण भागातील ९,५४,९०९ लोकसंख्येपैकी साक्षर लोकसंख्या ही ६,१३,७७१ अर्थात ७२.५२% असून त्यात ३,४४,५९३ अर्थात ८०.८७% पुरूष तर २,६९,१७८ अर्थात ६४.०५% स्त्रिया आहेत. शहरी भागातील एकूण १,१८,०३३ लोकसंख्येपैकी साक्षर लोकसंख्या ही ९४,५९४ अर्थात ८९% असून त्यात ५०५१७ पुरूष तर ४४,०७७ स्त्रिया आहेत. जिल्हयातील कुरखेडा, देसाईगंज, आरमोरी, मुलचेरा, गडचिरोली,

चामोर्शी, कोरची या ७ तालुक्यातील साक्षरतेचे प्रमाण हे जिल्हयाच्या ग्रामीण साक्षरतेपेक्षा कमी आहे. जिल्हयातील ग्रामीण भागातील स्त्री व पुरूषांतील साक्षरतेमधील अंतर हे १६.८२% असून, एटापल्ली तालुक्यात ते १५.३०% इतके सर्वात कमी तर गडचिरोली तालुक्यात सर्वाधिक १८.९८% इतके आहे. जिल्हयात पुरूषांमधील साक्षरतेचे प्रमाण हे देसाईगंज तालुक्यात सर्वाधिक म्हधजे ९०.१३% असून सर्वात कमी भामरागड तालुक्यात ६३.५७% इतके आहे. तसेच स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण हे देसाईगंज तालुक्यात सर्वाधिक ७५.५०% असून सर्वात कमी भामरागड तालुक्यात ४५.६७% इतके आहे.

जिल्हयातील १२ तालुक्यांपैकी सर्वाधिक साक्षर असलेला तालुका देसाईगंज असून तेथील साक्षरतेचे प्रमाण हे ८२.८४% इतके आहे. तर सर्वात कमी साक्षरता असलेला तालुका म्हणजे भामरागड होय. तेथील साक्षरतेचे प्रमाण हे ५४.७१% असून, तालुक्यातील जवळपास निम्मे व्यक्तीच साक्षर आहेत. याचे सर्वात महत्चाचे कारण म्हणजे भामरागड हा गडचिरोली जिल्हयातील अतिशय दुर्गम असलेला तालुका होय. या भागात शिक्षणाच्या सोयी सुविधा अजूनही पाहिजे त्या प्रमाणात पोहोचलेल्या नाहीत.

जिल्हयातील स्त्री व पुरूष साक्षरतेमधील एकूण अंतर हे १६.०४% इतके आहे. हे अंतर १४.६३ ते १७.९०% दरम्यान जिल्हयातील तालुक्यात आढळते. ग्रामीण भागात स्त्री व पुरूष साक्षरतेतील हे अंतर १५.५० ते १८.९८% दरम्यान आहे. तर शहरी भागात हे अंतर ७.७३ ते १३.९३% दरम्यान आहे.

जिल्हयातील १५०९ मानवी वास्तव्य असलेल्या गावापैकी एकूण १० गावे ही ९१ ते ९९% यादरम्यान साक्षरता असलेली आहेत व त्यांचे जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येपैकी वाटा हा १.६० टक्के इतका आहे. ५१ ते ९०% साक्षरता असलेली एकूण १२३४ गावे असून त्यांचा लोकसंख्येतील वाटा हा ९२.०३% इतका आहे. तर ० ते ५०% या दरम्यान साक्षरता असलेली जिल्हयात २६४ गावे असून त्यांचा लोकसंख्येतील वाटा हा ६.३७% इतका आहे.

**अनुसूचित जमातींमधील स्त्री–पुरूश साक्षरता :**
**ग्रामीण क्षेत्र –**

गडचिरोली जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जमातींमधील एकूण साक्षर लोकसंख्या ही २,३४,६४८ इतकी असून त्यात १,३१,७१४ पुरूष तर १,०२,९३४ इतक्या स्त्रियांचा अंतर्भाव होतो. जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जमातीमधील साक्षरतेचे प्रमाण हे ६७.०९% असून, त्यात पुरूष साक्षरतेचे प्रमाण हे ७५.५४% तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण हे ५८.६९% आहे. जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील स्त्री व पुरूष साक्षरतेतील अंतर हे १६.८५% असल्याचे दिसून येते. जिल्हयातील ग्रामीण भागातील अनुसूचित जमातीमधील निरक्षर लोकसंख्या ही १,६३,६१८ असून त्यात ६७,०३९ पुरूष तर ९६,५७९ स्त्रियांचा समावेश होतो.

गडचिरोली जिल्हयातील ग्रामीण भागातील अनुसूचित जमातीमधील साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण हे देसाईगंज तालुक्यात असून, त्यानंतर अनुक्रमे कुरखेडा, आरमोरी, गडचिरोली, मुलचेरा, चामोर्शी, कोरची, धानोरा, अहेरी, एटापल्ली, सिरोंचा व सर्वात कमी साक्षर म्हणून भामरागड या तालुक्याचा क्रमांक लागतो.

## ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जमातीमधील स्त्री व पुरूषं यांच्यातील साक्षरतेची संख्या व टक्केवारी दर्शविणारा तक्ता :–

| अनुक्रमांक | ग्रामीण क्षेत्राचे नाव | साक्षर व निरक्षर यांची एकूण संख्या | | | | | | साक्षरता दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | साक्षर लोकसंख्या | | | निरक्षर लोकसंख्या | | | | | |
| | | व्यक्ती | पुरूष | स्त्री | व्यक्ती | पुरूष | स्त्री | व्यक्ती | पुरूष | स्त्री |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | देसाईगंज | ३९०८ | २१४१ | १७६७ | १४८५ | ५४५ | ९४० | ८१.३३ | ९०.०० | ७२.८४ |
| २ | टारमोरी | १५८४१ | ८८०३ | ७०३८ | ७२७९ | २७८१ | ४४९८ | ७५.७८ | ८४.२३ | ६७.३२ |
| ३ | कुरखेडा | ३१२४१ | १७४४२ | १३७९९ | १४१३९ | ५४२५ | ८७१४ | ७७.६२ | ८६.१४ | ६८.९९ |
| ४ | कोरची | १९४७४ | १०६९५ | ८७७९ | ११८५९ | ४६१३ | ७२४६ | ७१.३४ | ८०.३२ | ६२.७९ |
| ५ | धानोरा | ३५१४६ | १९६२१ | १५५२५ | २३५९९ | ९४६८ | १४१३१ | ६८.५१ | ७७.३७ | ५९.८६ |
| ६ | गडचिरोली | १३६९९ | ७७६५ | ५९३४ | ६७८४ | २५३० | ४२५४ | ७४.३३ | ८३.७२ | ६४.८२ |
| ७ | चामोर्शी | २०८३७ | ११८४८ | ८९८९ | ११३१४ | ४३९० | ६९२४ | ७२.२२ | ८१.१८ | ६३.०५ |
| ८ | मुलचेरा | ९७९२ | ५५६७ | ४२२५ | ५०४२ | २००९ | ३०३३ | ७३.३० | ८१.७० | ६४.५५ |
| ९ | एटापल्ली | ३३४६५ | १८८१५ | १४६५० | ३३१३२ | १४४३४ | १८६९८ | ५८.४१ | ६५.९० | ५०.९७ |
| १० | भामरागड | १२५०१ | ७२९४ | ५२०७ | १६९५८ | ७३३९ | ९६१९ | ५०.१७ | ५८.९६ | ४१.५० |
| ११ | टहेरी | ३०२९१ | १६८८६ | १३४०५ | २३८४१ | १००९९ | १३७४२ | ६३.४८ | ७१.११ | ५.९१ |
| १२ | थ्सरोंचा | ८४५३ | ४८३७ | ३६१६ | ८१८६ | ३४०६ | ४७८० | ५७.७७ | ६६.६३ | ४९.०४ |
| एकूण | | २३४६४८ | १३१७१४ | १०२९३४ | १६३६१८ | ६७०३९ | ९६५७९ | ६७.०९ | ७५.५४ | ५८.६९ |

### शहरी क्षेत्र –

गडचिरोली जिल्हयात शहरी क्षेत्र म्हणून एकूण ६ शहरांचा समावेश करण्यात आलेला असून, ती क्षेत्र देसाईगंज, कुरखेडा, गडचिरोली, आष्टी, अहेरी व सिरोंचा ही होत.

## शहरी क्षेत्रातील अनुसूचित जमातीमधील स्त्री व पुरूषं यांच्यातील साक्षरतेची संख्या व टक्केवारी दर्शविणारा तक्ता :–

| अनुक्रमांक | शहरी क्षेत्राचे नाव | साक्षर व निरक्षर यांची एकूण संख्या | | | | | | साक्षरता दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | साक्षर लोकसंख्या | | | निरक्षर लोकसंख्या | | | | | |
| | | व्यक्ती | पुरूष | स्त्री | व्यक्ती | पुरूष | स्त्री | व्यक्ती | पुरूष | स्त्री |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | देसाईगंज | १४२६ | ७३३ | ६९३ | ३८० | १४२ | २३८ | ८७.२२ | ९३.७३ | ८१.२४ |
| २ | कुरखेडा | १२३६ | ६३४ | ६०२ | २१० | ८३ | १२७ | ९३.०० | ९६.२१ | ८९.८५ |
| ३ | गडचिरोली | ६६१२ | ३४१४ | ३१९८ | १३२६ | ५५९ | ७६७ | ९२.०३ | ९५.७१ | ८८.३९ |
| ४ | आष्टी | ३६४ | १८२ | १८२ | १०८ | ४९ | ५९ | ८६.४६ | ९०.५५ | ८२.७३ |
| ५ | अहेरी | ३१४९ | १३८५ | १३८५ | ९५२ | ३६० | ५९२ | ८३.९७ | ९०.८८ | ७६.५६ |
| ६ | सिरोंचा | १०३४ | ४२६ | ४२६ | २४३ | ९६ | १४७ | ८८.५३ | ९४.१२ | ८१.६१ |
| एकूण | | १३८२१ | ६४८६ | ६४८६ | ३२१९ | १२८९ | १९३० | ८९.२४ | ९४.०९ | ८४.३२ |

गडचिरोली जिल्हयातील शहरी भागातील अनुसूचित जमातीमधील एकूण साक्षर लोकसंख्या ही १३,८२१ असून त्यात ७,३३५ पुरूष तर ६,४८६ स्त्रियांचा समावेश होतो. जिल्हयातील अनुसूचित जमातीमधील साक्षरतेचे एकूण प्रमाण हे ८९.२४% इतके असून त्यात ९४.०९% पुरुष तर ८४.३२% स्त्रियांचा समावेश होतो. शहरी भागातील अनुसूचित जमातीमधील स्त्री–पुरुष साक्षरतेतील एकूण फरक हा ९.७७% असल्याचे दिसून येते. शहरी भागातील अनुसूचित जमातीमधील निरक्षर लोकसंख्या ही ३,२१९ इतकी असून त्यात १,२८९ इतके पुरूष तर १,९३० इतक्या स्त्रिया आहेत. जिल्हयातील शहरी भागातील अनुसूचित जमातीमधील सर्वाधिक साक्षरता ही कुरखेडा शहरी भागात ९३.००% इतकी असून, सर्वात कमी ८३.९७% अहेरी येथील आहे. कुरखेडा व गडचिरोली या दोन शहरी भागातील अनुसूचित जमातीमधील साक्षरता दर हा जिल्हयाच्या शहरी भागातील ८९.२४% च्या वर असून, इतर ४ शहरी भागातील साक्षरतेचे प्रमाण हे त्याखाली असल्याचे दिसून येते.

जिल्हयातील अनुसूचित जमातीमधील पुरूषांमध्ये साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण हे कुरखेडा येथे ९६.२१% इतके, तर सर्वात कमी ९०.५५% आष्टी येथे असल्याचे दिसून येते. स्त्रियांमध्ये साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण हे ८९.८५% कुरखेडा येथे तर सर्वात कमी ७६.५६% अहेरी या शहरी भागात असल्याचे दिसून येते. अनुसूचित जमातीमधील पुरुष व स्त्रिया यांच्या शहरी भागातील साक्षरता दरात एकूण 9.77% चे अंतर असल्याचे दिसून येते.

## साक्षरता दरानुसार अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची गावांमध्ये विभागणी :–

| गावांकरिता साक्षरता दराचे प्रमाण | अनुसूचित जमातीचे वास्तव्य असलेल्या गावांची संख्या | गावांचे शेकडा प्रमाण | अनुसूचित जमातीची लोकसंख्या | लोकसंख्येचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ० | ८ | ०.५५ | २९ | ०.०१ |
| १ — १० | ३ | ०.२१ | २०१ | ०.०५ |
| ११ — २० | ५ | ०.३५ | ४२२ | ०.११ |
| २१ — ३० | ३३ | २.२८ | ६५२४ | १.६४ |
| ३१ — ४० | ७० | ४.८४ | ११४५९ | २.८८ |
| ४१ — ५० | १७० | ११.७६ | ३६३९४ | ९.१४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५१ — ६० | २३२ | १६.०६ | ५९६०० | १४.९६ |
| ६१ — ७० | ४०२ | २७.८२ | ९९४६२ | २४.९७ |
| ७१ — ८० | ३८२ | २६.४४ | १२७८१५ | ३२.०९ |
| ८१ — ९० | १०२ | ७.०६ | ५००६९ | १२.५७ |
| ९१ — ९९ | १६ | १.११ | ६२२४ | १.५६ |
| १०० | २२ | १.५२ | ६७ | ०.०२ |
| | ११४५ | १००.०० | ३९८२६६ | १००.०० |

अनुसूचित जमातीमधील साक्षरता दरानुसार गावांची विभागणी केली असता असे दिसून येते की, ० साक्षरता असलेली ८ गावे यामध्ये मोडतात. ९० च्या वर साक्षरता दर असलेली एकूण ३८ गावे, ज्यांचे लोकसंख्येशी शेकडा प्रमाण हे १.५८ आहे, यामध्ये मोडतात. ७१—९० या दरम्यान साक्षरता दर असलेली एकूण ४६८ गावे, ज्यांचे लोकसंख्येशी शेकडा प्रमाण ४४.६६ आहे, यामध्ये मोडतात, तर ५१—७० साक्षरता दर असलेल्या एकूण ६३४ गावांनी ३९.९४% अनुसूचित जमातीची लोकसंख्या व्यापलेली आहे. उर्वरित २८१ गावे ही १ ते ५० या दरम्यान साक्षरता असलेल्या श्रेणीमध्ये येत असून, त्यांनी अनुसूचित जमातीची १३.८१% लोकसंख्या व्यापलेली आहे.

## गडचिरोली जिल्हयात अनुसूचित जमातीमध्ये साक्षरता दर कमी असण्याची कारणे :—

१. घरात असलेले अठराविश्व दारिद्रय
२. शिक्षणाबाबत जागरूकतेची कमी
३. शाळेमध्ये शौचालय इत्यादी व्यवस्थेची कमी
४. जिल्हयात फोफावत असलेला नक्षलवाद
५. मुलींसोबत बलात्कार अथवा छेडछाड होण्याची भिती
६. जातीयवाद, अस्पृश्यतावाद
७. शाळांची कमी संख्या

## गडचिरोली जिल्हयात अनुसूचित जमातीमध्ये साक्षरता दर वाढविण्याचे उपाय :—

१. साक्षरता प्रसारासाठी शासनस्तरावर प्रामाणिक प्रयत्न व्हायला हवेत.
२. द्रारिद्रय निर्मूलनासाठी रोजगाराच्या संधी निर्माण व्हायला हवेत.
३. शाळा सर्व सुविधांयुक्त असायला हवेत.
४. जिल्हयातील नक्षलवाद आटोक्यात आणायला हवा.
५. मुलींमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्याकरिता तशी व्यवस्था निर्माण करायला हवी.
6. जातीव्यवस्थेचे, अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन व्हायला हवे.
7. शाळांची संख्या वाढवून दुर्गम भागातही शिक्षणाच्या सोयी—सुविधा निर्माण करायला पाहिजेत.

## संदर्भ सूची :—

१. Census 2011 Data –censusindia.gov.in
२. Gadchiroli. Maharashtra –Wikipedia
3. आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्या प्रा. डॉ. वर्षा गंगणे
4. आदिवासी स्त्री व राजकारण डॉ. श्रीराम महादेव महाकरकार



**प्रवीण परसराम बोरकर**
**संशोधक**

LBP PUBLICATION